# घटक : आंतरराज्यीय संबंध

## 1) आंतरराज्यीय जलविवाद :

* कलम २६२ - आंतरराज्यीय जलविवादाच्या निवाड्याची तरतूद.

① आंतरराज्यीय नद्या आणि नदी खोरे यांच्या वापर, नियंत्रण, वितरण - विवादाबाबत

② असे विवाद कोणत्याही न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात असणार नाहीत.

त्यानुसार नदी मंडळे कायदा १९५६ } पारित केले.
आंतरराज्यीय जलविवाद कायदा १९५६ }

→ नदी मंडळे स्थापन करण्याची तरतूद - संबंधित सरकारच्या विनंतीवरून केंद्र सरकार स्थापन करील.

→ दोन किंवा अधिक राज्यातील विवादाच्या निवाड्यासाठी तात्पुरती न्यायाधिकरण स्थापन करण्याचा केंद्र सरकारला अधिकार. - निर्णय अंतिम व बंधनकारक.

आतापर्यंत आठ आंतरराज्य जलविवाद न्यायाधिकरणांची स्थापना :

| अ.क्र. | नाव. | स्थापना वर्ष | संबंधित राज्ये |
|---|---|---|---|
| १ | कृष्णा जल विवाद न्यायाधिकरण | १९६९ | महाराष्ट्र, कर्नाटक, विभाजनपूर्व आंध्रप्र. |
| २. | गोदावरी —॥— | १९६९ | —॥— मध्य प्रदेश व ओडिशा. |
| ३. | नर्मदा —॥— | १९६९ | राजस्थान, गुजरात, म. प्रदेश, महाराष्ट्र |
| ४. | रावी व बियास —॥— | १९८६ | पंजाब, हरियाणा, राजस्थान |
| ५. | कावेरी —॥— | १९९० | कर्नाटक, केरळ, ता. नाडू, पुदुच्चेरी |
| ६. | दुसरे कृष्णा —॥— | २००४ | महाराष्ट्र, कर्ना, विभाजनपूर्व आंध्र प्र. |
| ७. | वंशधरा —॥— | २०१० | ओडिशा व विभाजनपूर्व आंध्र प्र. |
| ८. | महादायी —॥— | २०१० | गोवा, कर्नाटक, महाराष्ट्र. |

## ② आंतरराज्यीय परिषदा

* कलम २६३ अंतर्गत —

राष्ट्रपती स्थापन करू शकतो - कार्ये, संघटना, कार्यपद्धती राष्ट्रपती ठरवतात.

⇒ आंतरराज्यीय विवादांची चौकशी करून त्यावर सल्ला देणे हे परिषदेचे कार्य.

⇒ कायदेविषयक व इतर सर्व प्रकारचे विवाद हाताळते. परंतु निर्णय सल्लागारी न्यायालयांच्या निर्णयाप्रमाणे बंधनकारक नाहीत.

Scanned by CamScanner

संबंधीत विषयामध्ये धोरण व कृती यामध्ये चांगला समन्वय साधण्यासाठी राष्ट्रपतीने खालील परिषदांची स्थापना केली आहे.

① केंद्रिय आरोग्य परिषद
② केंद्रिय स्थानिक सरकार व नगर विकास परिषद (सुरुवातीचे नाव स्वशासनाची केंद्रिय परिषद)
③ उत्तर, पूर्व, पश्चिम, दक्षिण विभागासाठी विक्रीकराच्या चार क्षेत्रिय परिषदा.
④ केंद्रिय भारतीय वैद्यक परिषद } स्थापना संसदेच्या कायद्याद्वारे.
⑤ केंद्रिय होमियोपॅथी परिषद }

## आंतरराज्यीय परिषदेची स्थापना

सरकारिया आयोगाच्या शिफारशीनुसार V. P. Singh यांच्या नेतृत्वाखाली जनता दल सरकारने १९९० मध्ये आंतरराज्यीय परिषदेची स्थापना.

खालील सदस्य असतात - ① पंतप्रधान ⟶ पदसिद्ध अध्यक्ष
② सर्व राज्यांचे मुख्यमंत्री
③ विधानसभा असलेल्या संघराज्य प्रदेशांचे मुख्यमंत्री
④ —"— नसलेल्या —"— प्रशासक
⑤ राष्ट्रपती राजवट असलेल्या राज्यांचे राज्यपाल.
⑥ पंतप्रधान नामनिर्देशित करतील असे गृहमंत्र्यासहित सहा केंद्रिय कॅबिनेट मंत्री
⑦ पाच कॅबिनेट मंत्री कायमस्वरूपी निमंत्रित सदस्य असतील.

* केंद्र-राज्ये, केंद्र-संघराज्य, राज्ये-राज्ये यांच्यातील समस्यावर शिफारस करु शकते.

कार्ये - ① केंद्र व राज्य समान हित असलेल्या विषयांचे सखोल परिक्षण.
② चांगल्या धोरण व कृतीची शिफारस.
③ राज्यांच्या सर्वसाधारण हिताच्या बाबीविषयी सतत विचारविनिमय.

एका वर्षात किमान ३ बैठका ⟶ बंदिस्त खोलीत.

⟶ परिषदेची एक स्थायी समिती ⟶ १९९६ मध्ये स्थापना. — विचारविनिमय / कामकाजासाठी
↓
सदस्य ⟶ ① केंद्रिय गृहमंत्री (पदसिद्ध अध्यक्ष)
② पाच केंद्रिय कॅबिनेट मंत्री
③ नऊ मुख्यमंत्री.

⟶ परिषदेला साहाय्य करण्यासाठी - आंतरराज्यीय परिषद सचिवालय. स्थापना - १९९१
प्रमुखपदी - भारत सरकारचा सचिव
२०११ पासून विभागीय ~~राज्य~~ परिषदांचे सचिवालय म्हणून काम.

## सार्वजनिक कृती आणि न्यायीक कामकाज

① केंद्राच्या आणि प्रत्येक राज्याच्या सार्वजनिक कृती, नोंदी, न्यायीक कामकाज यांना भारताच्या संपूर्ण क्षेत्रात पूर्ण श्रद्धा आणि मान्यता दिली जाईल.

Scanned by CamScanner

② भारतातील कोणत्याही भागातील दिवाणी न्यायालयाने दिलेले निर्णय आणि आदेश भारतात कोठेही अंमलात आणता येतात. (निकालावर नवीन दावा दाखल न करता)
फक्त दिवाणी निर्णयासाठी फौजदारी निर्णयाला लागू नाही.
म्हणजेच एका राज्याचे दंडात्मक कायदे दुसऱ्या राज्यातील न्यायालयाने लागू केलेच पाहिजेत असे नाही.

## आंतरराज्य व्यापार आणि वाणिज्य

भाग १३ ⟹ कलम ३०१ ते कलम ३०७ - व्यापार, वाणिज्य व व्यवहारासंबंधी.

३०१ ⇒ भारताच्या संपूर्ण क्षेत्रात व्यापार, वाणिज्य व व्यवहार मुक्त असतील
↳ अपवाद/बंधने (कलम ३०२ ते ३०५)

३०२ - निर्बंध घालण्याचा संसदेचा अधिकार
३०३ - संदर्भात संघराज्य व राज्यांच्या कायदे करण्याच्या अधिकारावर निर्बंध.
३०४ - राज्यांतर्गत - निर्बंध
३०५ - राज्याची मक्तेदारी असणारे कायदे रद्द करणे.

या सर्व कलमान्वये ① संसद एका राज्याला दुसऱ्या राज्यापेक्षा अधिक प्राधान्य देऊ शकत नाही.
② राज्यविधीमंडळ एका राज्याला इतर राज्यापेक्षा अधिक प्राधान्य —॥—.
③ राज्याने भेदभाव करणारे कर लावण्यावर बंदी.

## विभागीय परिषदा

① वैधानिक संस्था आहे, (घटनात्मक नाहे) - स्थापना राज्यपुनर्रचना कायदा १९५६ नुसार
उत्तर, पूर्व, मध्य, दक्षिण, पश्चिम ⟹ पाच भाग - प्रत्येक भागासाठी विभागीय परिषद

सदस्य.
① केंद्रीय गृहमंत्री - (पाचही विभागीय परिषदांचा अध्यक्ष)
② विभागातील सर्व राज्यांचे मुख्यमंत्री - (आळीपाळीने परिषदेचा उपाध्यक्ष - (१ वर्ष)
③ विभागातील प्रत्येक राज्याचे दोन इतर मंत्री
④ प्रत्येक केंद्रशासित प्रदेशाचा प्रशासक

पुढील व्यक्ती सल्लागार म्हणून : ① नियोजन आयोगाने नामनिर्देशित केलेला सदस्य.
(मतदान अधिकार नसतो) ② विभागातील प्रत्येक राज्याचा मुख्य सचिव
③ —॥— विकास आयुक्त

## उद्दिष्ट्ये व कार्य

① भावनिक ऐक्य
② राज्यवाद, क्षेत्रवाद, भाषावाद यांना आळा.
③ सामाजिक/आर्थिक मुद्यावर केंद्र व राज्य यांना सहकार्य करणे.
④ मोठे विकास प्रकल्प यशस्वी व जलद गतीने पूर्ण करण्यासाठी सहकार्य.

## ईशान्य परिषद

स्थापना १९७२ - ८ ऑगस्ट (ईशान्य परिषद कायदा १९७१)
(आसाम, मणिपूर, मिझोराम, नागालँड, अरुणाचलप्र., सिक्कीम, त्रिपुरा, मेघालय)
कार्ये. विभागीय परिषदाप्रमाणेच. तसेच संरक्षण आणि सार्वजनिक सुव्यवस्था राखण्या-

बाबत सदस्य राज्यांनी केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेणे हे परिषदेचे काम.

## विभागीय परिषदा

| अ.क्र. | नाव | सदस्य राज्ये | मुख्यालय |
|---|---|---|---|
| ① | उत्तर विभागीय परिषद | जम्मू व काश्मीर, हि.प्र, हरियाणा, पंजाब, राज., दिल्ली व चंडीगड | नवी दिल्ली |
| ② | मध्य —"— | उ.प्र, उत्तराखंड, छत्तीसगड, म.प्र | अलाहाबाद |
| ③ | पूर्व —"— | बिहार, झारखंड, प. बंगाल, ओडिशा | कोलकाता |
| ④ | पश्चिम —"— | गुजरात, महा, गोवा, दादरा नगर हवेली व दमण आणि दिव | मुंबई |
| ⑤ | दक्षिण —"— | आंध्र, तेलंगणा, कर्ना, ता.नाडू, केरळ व पुदुच्चेरी | चेन्नई |

Scanned by CamScanner